थोडक्यात...

डिजिटल हेल्थ टेक स्टाट एप्स क्लिनिकमध्ये लसीसाठी व्हर्च्युअल अपॉईंटमेंट

■ मुंबई

राज्यासह शहरात कोरोनाचा फैलाव वाढत असून गर्दी टाळण्यासाठी शासन सर्वोत्तपरी प्रयत्न करीत आहे. नागरिकांना खरेदी वा बुकिंगसाठी सोपस्कर ठरेल असे ऑनलाईन ॲप्स मार्केटमध्ये येत आहेत. मुंबईतील आरोग्य तंत्रज्ञानाने नागरिकांना लसीकरण करण्यासाठी जवळच्या डॉक्टर किंवा लसीकरण क्लिनिकची भेट घ्यावी यासाठी अर्ज दाखल केला होता त्या पार्श्वभूमीवर वॉनड्रॅक्स हे डिजिटल हेल्थ टेक स्टाट ॲप सुरू करण्यात आले आहे. या ॲप द्वारे नागरिकांना सहजपणे लस उपलब्द होणार आहे. यासाठी वॉनड्रॅक्स या ॲपने देशभरातील डॉक्टर आणि आरोग्य सेवाशी करार केला आहे. या प्रसंगी वॉनड्रॅक्सचे सह संस्थापक पंकज अग्रवाल म्हणाले की हा ॲप नागरिकांना पसंतीच्या लसीकरण दवाखान्यांसह त्यांचे बुकिंग करण्यात मदत करेल. सदर ॲप हे गुगल प्ले स्टोर द्वारे डाउनलोड करता येणार असल्याचे अग्रवाल म्हणाले.

विस्कळीत सेवेमुळे एमटीएनएल कार्यालयावर मनसेची धडक

■ मुंबई

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गेली काही महीने लोकांना ऑनलाइन पद्धतीने घरी बसून काम करावे लागत आहे मात्र एमटीएनएलच्या विस्कळीत सेवेमुळे कामात अडथळा येत असल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्यानंतर मनसेने कार्यालयावर धडक देत अधिकाऱ्याना जाब विचारला. एमटीएनएलच्या ग्राहकांना गेली ६-७ महीने ब्रॉड बँड तसेच मोबाईल सेवा व्यवस्थित पुरविल्या जात नाही विद्यार्थ्यांना ऑनलाइन अभ्यासात खंड पडत आहे घरी काम करणाऱ्या नोकरदारांनाही अडचणी निर्माण होत असल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या होत्या नागरिकांच्या तक्रारीनंतर त्यांना भेडसवणाऱ्या समस्येबाबत मनसेचे माहीम विधानसभा विभाग अध्यक्ष यशवंत किल्लेदार यांनी एमटीएनएल कार्यालयात जावून याबाबत एमटीएनएलच्या कार्यकारी संचालकांकडे विचारणा केली. वर्क फ्रॉम होम ही संकल्पना बऱ्याच खासगी कंपन्यांनी अमलात आणली आहे त्यामुळे कर्मचाऱ्यांचा रोजगार सुरक्षित राहिला आहे शाळा महाविद्यालयात देखील ऑनलाइन शिक्षण सुरू करण्यात आले आहे तर मीटिंग देखील झुम ॲपद्वारे होऊ लागल्या आहेत. या सर्व बेसिक सेवा एमटीएनएल कडून त्यांच्या ग्राहकाना पुरविण्यात येतात नगरिकांना एमटीएनएलची सेवा हवी आहे तरीही व्यवस्थापन ते चांगल्याप्रकारे देण्यास असमर्थ ठरत आहेत सर्व सेवा बंद असताना बिले का पाठविली जातात असा सवाल किल्लेदार यांनी केला. सेवा पूर्ववत करण्यासाठी मुंबईतील पाच झोन मध्ये ५ ठेकेदारांची नियुक्ती करण्यात करण्यात येणार असून काम जलद गतीने होण्यासाठी त्यांच्यात कामाची विभागणी करण्यात येणार आहे. त्यानुसार त्यांना कालमर्यादा देण्यात आली असून ठरलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास त्यांच्या कडून दंड आकरण्यात येणार आहे त्याचप्रमाणे गेल्या ५, ६ महिन्यात सेवा बंद असून ग्राहकाना बिले देण्यात आली त्यात त्यांना रिबेट देण्यात येणार असल्याचे आश्वासन एमटीएनएलच्या कार्यकारी संचालकांनी दिल्याचे किल्लेदार यांनी सांगितले.

७२० पथकांव्दारे 'माझे कुटुंब - माझी जबाबदारी' मोहीमेत घरोघरी आरोग्य सर्वेक्षण

■ नवी मुंबई

कोव्हीडमुक्त महाराष्ट्राचे ध्येय नजरेसमोर ठेवून मुख्यमंत्री ना.श्री. उध्दव ठाकरे यांच्या मार्गदर्शनानुसार 'माझे कुटुंब - माझी जबाबदारी' ही राज्यव्यापी मोहीम १५ सप्टेंबर ते १० ऑक्टोबर असा पहिला टप्पा आणि १४ ते २४ ऑक्टोबर असा दुसरा टप्पा अशी दोन टप्प्यात राबविण्यात येत आहे.

नवी मुंबई महानगरपालिका आरोग्य विभागाच्या वतीने ही मोहीम महापालिका क्षेत्रात प्रभावीपणे राबविण्यात येत असून महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली ७२० हून अधिक पथकांच्या माध्यमातून ५ लाखाहून अधिक घरांना भेटी देऊन नागरिकांचे आरोग्य सर्वेक्षण करण्यात येत आहे. प्रत्येक पथक दररोज ५० घरांना भेट देऊन माहिती संकलीत करेल अशा प्रकारे पथके तयार करण्यात आलेली आहे.

या एका पथकामध्ये दोन ते तीन कर्मचारी / स्वयंसेवक असणार असून त्यांस 'करोना दूत' असे संबोधले जाईल. या पथकाव्दारे घरोघरी भेटी देऊन घरातील प्रत्येकाचे शारीरिक तापमान व ऑक्सिजन सॅच्युरेशन मोजले जाणार आहे. त्याचप्रमाणे, घरातील एखाद्या व्यक्तीला ताप , खोकला, घशात खवखवणे, थकवा, श्वास घेण्यास त्रास अशाप्रकारचा त्रास होत आहे काय याची माहिती घेतली जाणार आहे. तसेच कोणास मधुमेह, हृदयरोग, कर्करोग, किडनीचे आजार, अवयव प्रत्यारोपण, दमा अशा सहव्याधी (को-मॉर्बिडिटी) आहेत काय याचीही माहिती संकलित केली जाणार आहे. ही सर्व माहिती ॲपमध्ये दाखल केली जाणार असून सर्वेक्षण झाल्यानंतर घराला एक स्टिकर लावण्यात येणार आहे.

गृहभेटी दरम्यान कुटुंबातील व्यक्तींची माहिती घेताना शासन निर्देशानुसार सामान्य व्यक्ती (कोव्हीड पूर्व व्यक्ती), कोव्हीड पॉझिटिव्ह व्यक्ती आणि कोव्हीड होऊन गेलेली व्यक्ती अशा तीन प्रकारांमध्ये माहिती संकलित केली जाणार आहे व त्यांच्या प्रकारानुसार त्यांस आरोग्य

संदेश दिले जाणार आहेत. यामध्ये प्रामुख्याने नियमित मास्क लावणे, वारंवार हात धुणे, सॅनिटायझर वापरणे, आजार न लपवता आवश्यकतेनुसार फिव्हर क्लिनिकला भेट देणे, सहव्याधी (कोमॉर्बिडिटी) असल्यास नियमित औषधोपचार घेणे, प्लाझमा डोनेशनबाबत माहिती देणे अशी विविध माहिती प्रसारीत केली जाणार आहे.

या सर्वेक्षणात एखाद्या व्यक्तीस ताप असून त्याचे तापमान १००.४ डिग्री फॅरेनहाईट तसेच ऑक्सिजन सॅच्युरेशन ९५ टक्के पेक्षा कमी असल्यास तसेच एखाद्या सहव्याधी (कोमॉर्बिड) असणा-या व्यक्तीसही ताप असल्यास नजिकच्या फिव्हर क्लिनीकला पाठविले जाणार आहे. त्याचप्रमाणे, एस.ए.आर.आय./आय.एल.आय.ची लक्षणे असल्यास त्यांनादेखील फिव्हर क्लिनीकला संदर्भित करण्यात येईल. ताप आणि ऑक्सिजन सॅच्युरेशन कमी व सहव्याधी (कोमॉर्बिडिटी) या तीनपैकी दोन लक्षणे असल्यास अशा व्यक्तींना अतिजोखमीचे (हाय रिस्क) समजून त्यांची कोव्हीड चाचणी करून त्यांस आवश्यकतेनुसार संबंधित वैदयकीय अधिकारी यांच्यामार्फत नजिकच्या कोव्हीड केअर सेंटर ला संदर्भित करण्यात येईल.

'माझे कुटुंब, माझी जबाबदारी' या प्रत्येकाच्या आरोग्याची काळजी घेणाऱ्या मोहीमेत ७२० पथकांव्दारे ५,३८,०३२ घरांचे सर्वेक्षण करणार असून गृहभेटींव्दारे संशयीत कोव्हीड तपासणी व उपचार, सहव्याधी (कोमॉर्बिड) व अतिजोखमीची व्यक्ती ओळखून त्यांना उपचार आणि प्रतिबंधासाठी आरोग्य शिक्षण, एस.ए.आर.आय./आय.एल.आय. रुग्णांचे सर्वेक्षण व उपचार तसेच प्रत्येक नागरिकाचे कोव्हीड-१९ बाबत आरोग्य शिक्षण अशी मोहिमेची उद्दिष्टये साध्य करणार आहेत.

सर्वेक्षणांतर्गात १४ ते २३ ऑक्टोबरच्या दुस-या टप्प्यात पथक पुन्हा घरांना भेटी देऊन दुस-यांदा सर्वांचे शारीरिक तापमान आणि ऑक्सिजन सॅच्युरेशन मोजणी करेल व नोंदी घेईल तसेच आरोग्य स्थिती लक्षात घेऊन योग्य कार्यवाही करेल. या सर्वेक्षणातून संकलीत होणाऱ्या माहितीच्या आधारे पुढे महानगरपालिका क्षेत्रातील सहव्याधी (कोमॉर्बिड) असणाऱ्या वा इतर नागरिकांना कोरोनाची लागण झाल्यास वेळेत व योग्य उपचार उपलब्ध करून देणे शक्य होणार आहे. यामुळे मृत्यूचे प्रमाण कमी होण्यासही मदत होणार आहे.

तरी सर्व सुजाण नवी मुंबईकर नागरिकांनी आपले नवी मुंबई शहर कोव्हीड मुक्त करण्यासाठी 'माझे कुटुंब, माझी जबाबदारी' या भूमिकेतून स्वयंशिस्त पाळून आपल्या कुटुंबापर्यंत कोव्हीडचा विषाणू पोहचणार नाही याची संपूर्ण दक्षता घ्यावी तसेच आपल्या घरी सर्वेक्षणासाठी येणाऱ्या नवी मुंबई महानगरपालिकेच्या पथकातील आरोग्य दूतांना सत्य माहिती देऊन संपूर्ण सहकार्य करावे असे आवाहन महापालिका आयुक्त श्री. अभिजीत बांगर यांच्या वतीने करण्यात येत आहे.

टेरवचे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते हणमंतराव के. कदम यांचे दुःखद निधन

■ टेरव

दसपटी, टेरव गावचे सुपूत्र व ज्येष्ठ समाज संघटक तसेच जय भवानी ग्रामोन्नती मंडळ व राधाकृष्ण साधनालय संघ, मुंबईचे माजी अध्यक्ष श्री. हणमंतराव केशवराव कदम यांचे वयाच्या ८४व्या वर्षी दिनांक १४/९/२०२० रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. ते अनेक सामाजिक तसेच धार्मिक संघटनांमध्ये कार्यरत होते.

ज्या काळात लोक जेमतेम सातवी पास होऊन मुंबईला नोकरी करायचे त्या काळात मुंबईच्या फर्ग्युसन कॉलेज मधून अण्णांनी प्रथम श्रेणीत बी. ए. ही पदवी संपादन केली. कदाचीत गावातील ते पहिले पदवीधर असावेत. ते एल.आय.सी.मध्ये अधिकारी होते व आपला सेवाकाल पूर्ण करूनच ते निवृत्त झाले. कै. अण्णांना सामाजिक कार्याची विशेष आवड होती. टेरव

गावातील सर्व जातिधर्मियांसाठी त्यांनी गावच्या संस्थेचे द्वार खुले केले. गावची शाळा दुरुस्ती, देवस्थानची कामे, विद्यार्थी गुणगौरव इ. साठी मंडळाकडून आर्थिक मदत सुरु केली.

स्वच्छ चारित्र्य व चोख आर्थिक व्यवहार ही त्यांची खास वैशिष्टये होती. त्यांच्या रुपाने समाजातील तळमळीचा सच्चा कार्यकर्ता हरपला आहे. समाजामध्ये एकता , बंधूभाव व सामंज्यसता वाढावी म्हणून त्यांनी कौटुंबिक जबाबदारी सांभाळून अथक परिश्रम घेतले.

शांत, संयमी व वाणी मध्ये गोडवा असे त्यांचे व्यक्तिमत्व असल्यामुळे समाजास त्यांचे मार्गदर्शन नेहमी हृदयस्पर्शी व मनोबल वाढविणारे असायचे. कै. अण्णांच्या पश्चात ४ पूत्र, सुना, नातवंडे असा त्यांचा परिवार आहे. ९ वर्षापूर्वी त्यांच्या पत्नी सौ. मालती यांचे आकस्मिक निधन झाल्यामुळे टेरवला राहून जनसेवा व गावचा विकास करण्याचे त्यांचे स्वप्न अधुरे राहिले. पापभिरू, एक सज्जन समाजसेवक व प्रामाणिक व्यक्तिमत्व आपल्यातून गेल्याने ख-या अर्थाने समाजातील एक मार्गदर्शक दीपस्तंभ हरपल्याची भावना सर्व समाजातून व्यक्त होत आहे. त्यांचे दसपिंड दि. २३/९/२० रोजी सकाळी शिवाजी पार्क, दादर येथे व सपेंडी ,उत्तरकार्य दि. २५/९/२० रोजी त्यांच्या राहत्या घरी, सायन, मुंबई येथे होणार आहे.

कुशाग्र, अभ्यासू रेखाताई थोरात यांचे वृद्धापकाळाने निधन

■ मुंबई

अत्यंत कुशाग्र बुद्धिमत्ता असलेल्या आणि गणितात हुशार म्हणून ओळखण्यात येणाऱ्या रेखाताई रघुनाथराव थोरात यांचे वयाच्या ७८ व्या वर्षी वार्धक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात रश्मी जोशी, राजीव थोरात, राजेश्री निगुडकर हे कन्या आणि सुपूत्र, जावई, नातवंडे असा परिवार आहे. रेखाताई आणि त्यांचे पती हे बोरीवली पूर्व येथील कुसुमभारती सहकारी गृहनिर्माण संस्था येथे अनेक वर्षांपासून वास्तव्यास होते. रघुनाथराव हे आपल्या उमेदीच्या काळात इंडियन एक्सप्रेस मध्ये ही कार्यरत होते. या सहकारी गृहनिर्माण संस्थेत त्यांनी अध्यक्षपद ही भूषविले होते. काही वर्षांपूर्वी रघुनाथराव यांचे देहावसान झाल्यानंतर रेखाताई

या कुसुमभारती मध्ये रहात होत्या.

सुमारे २८ वर्षे पोस्ट अँड टेलीग्राफ विभागात त्यांनी नोकरी केली. त्या पोस्ट आणि टेलीग्राफ या विभागातील पहिल्या आणि मोजक्या प्रशिक्षित महिला म्हणून टेलीग्राम (तार) या कामासाठी ओळखल्या जात होत्या. या विभागात सर्वोत्कृष्ट काम केल्यामुळे त्यांचा अतिशय सन्मान करण्यात येत होता. त्यांनी आपल्या गुणवत्तेच्या जोरावर आपले कर्तव्य पार पाडले. त्यांनी बढतीसाठी इन्कार केला आणि स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली. तळोजा पनवेल येथे काही काळ वास्तव्य केल्यानंतर त्यांनी तेथेच अखेरचा श्वास घेतला. परंतु त्यांची बोरीवलीच्या कुसुमभारतीमध्ये आपल्या आयुष्याचा अखेरचा क्षण व्यतीत करण्याची इच्छा होती, म्हणून त्यांना बोरीवलीच्या घरी आणण्यात आले. तेथे सर्वांनी अंत्यदर्शन घेतले आणि दौलतनगर स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. रेखाताई थोरात यांच्या निधनाने एक अत्यंत कुशाग्र बुद्धीच्या, सुस्वभावी व्यक्तिमत्वाला गमावले असल्याची भावना सर्वांनी व्यक्त केली.

कामण विद्यार्थ्यांच्या शिक्षण व्यथा कमी करण्यासाठी कनिष्ठ महाविद्यालयाची मागणी

सामाजिक कार्यकर्ते ॲड. दिनेश म्हात्रे यांची जिल्हा प्रशासनाकडे मागणी

■ वसई

वसई पूर्वेतील कामण परिसर हा बहुसंख्य आदिवासी बहुल भाग आहे. वसई-विरार शहर महानगरपालिका प्रशासन स्थापन झाले असले तरी अनेक मुलभूत समस्यांसाठी येथील नागरिकांना संघर्ष करावा लागत आहे. शिक्षण, वीज, पाणी, रस्ते यांसारख्या अनेक नागरी समस्यांनी कामण परिसरावर वसई-विरार महापालिकेने सातत्याने बहीष्कारच टाकला आहे. या विभागाच्या माजी नगरसेविका प्रिती दिनेश म्हात्रे आणि त्यांचे पती सामाजिक कार्यकर्ते ॲड. दिनेश म्हात्रे हे कामणच्या विकासासाठी सातत्याने शासनपातळीवर आवाज उठवत आहेत. प्रसंगी कामणच्या गोरगरीब जनतेला त्यांच्या न्याय हक्कासाठी सहाय्य करत आहेत. मागील काही वर्षांत त्यांच्या कामकाजाचा आढावा घेता त्यांनी अनेक महत्वाच्या मुद्द्यांवर समर्थपणे पाठपुरावा करून कामणवासीयांचे जीवन सुसह्य करण्याचे काम हाती घेतले आहे. आता कामण परिसरातील सामान्य विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयीन शिक्षणाचा प्रश्न त्यांनी हाती घेतला आहे. कामण येथील जिल्हा परिषद केंद्र शाळा कामण येथे कनिष्ठ (ज्युनियर) महाविद्यालय सुरू करण्याची मागणी करणारे निवेदन पालघर जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा शिक्षणाधिकारी आणि गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे केली आहे. या मागणीसाठी त्यांनी वसईच्या लोकप्रतिनिधींकडे देखील सहाय्य करण्याचे आवाहन केले आहे.

कामण येथील जिल्हा परिषद शाळा येथे प्रथमच १०वी चा वर्ग सुरू होऊन या वर्षीचा निकाल ९५ टक्के लागला आहे. याठिकाणी बहुसंख्य आदिवासी बांधव व कारखान्यामध्ये काम करणाऱ्या मजुरांची मुले शिक्षण घेत आहेत. या परिसरात एकूण तीन मराठी माध्यमाच्या शाळा तर काही इंग्रजी माध्यमांच्या शाळा आहेत. १०वी उत्तीर्ण झाल्यावर येथील विद्यार्थ्यांना पुढील महाविद्यालयीन शिक्षणासाठी वसई किंवा अन्य दुरच्या ठिकाणी जावे लागते. तसेच ११ वीत प्रवेश मिळवण्यासाठी खूप संघर्ष करावा लागतो. ११वीला प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांना बराच संघर्ष करावा लागतो. काही वेळेला त्यांना प्रवेश मिळत नाही व त्यांचे शिक्षण थांबते. तसेच काही पालकांना खाजगी कॉलेजचा खर्च व प्रवास खर्च परवडत नसल्याने ते आपल्या मुलांना पुढील शिक्षणासाठी पाठवत नाहीत व विद्यार्थी कुठेतरी रोजंदारीवर कारखान्यात कामावर जातात अथवा चुकीच्या मार्गाने जातात तसेच काही वेळेला मुलींची लवकर लग्न केली जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांची शिकण्याची इच्छा असून सुद्धा त्यांना शिक्षण थांबवावे लागते. व त्यांचे शैक्षणिक नुकसान होते. या परिसरातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी वसई किंवा विरार येथे जावे लागते. ते अंतर येथून २० ते २५ कि.मी. आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा वेळ व पैसा वाया जातो व प्रवासात वेळ गेल्याने त्यांचे शैक्षणिक नुकसान होते. या परिसरात कामण, पोमण, नागले, देवदळ, कोल्ही, चिंचोटी येथील ग्रामस्थांची कामण येथे ज्युनियर कॉलेज व्हावे अशी बऱ्याच वर्षांपासूनची मागणी आहे. शासनाने या परिस्थितीचा व ग्रामस्थांच्या मागणीचा विचार करून ११ वी चा वर्ग नव्याने सुरू करण्यात यावा, अशा मागणीचे निवेदन ॲड. दिनेश म्हात्रे यांनी सदरच्या निवेदनाच्या माध्यमातून केली आहे.

मुख्य कार्यालय विरार
विरार (पूर्व),
ता. वसई, जि.पालघर,
पिन ४०१ ३०५.

दुरध्वनी: ०२५०-२५२५१०१/ ०२/ ०३/ ०४/ ०५/ ०६
फॅक्स: ०२५०-२५२५१०७
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जा.क्र.: वविशम/बांध/३३१/२०२०
दिनांक :च १४/०९/२०२०

।। जाहिर प्रथम फेर ई-निविदा सुचना।।

वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील विविध कामांसाठी ऑनलाईन निविदा मागविणेत येत आहेत.

३ कामांच्या ई-निविदा सुचना व निविदा प्रपत्र https://mahatenders.gov.in च्या संकेतस्थळावर दि. १६/०९/२०२० ते दि. २८/०९/२०२० रोजी दु. ३.०० वाजेपर्यंत उपलब्ध होणार आहेत. https://mahatenders.gov.in च्या संकेतस्थळावर दि. २८/०९/२०२० रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील.

ठिकाण - विरार
दिनांक - १४/०९/२०२०

सही/ -
कार्यकारी तथा शहर अभियंता
वसई-विरार शहर महानगरपालिका

छत्रपतींच्या काळात एक इंजिनीअर म्हणून बरेच काही शिकता आले असते - जयंत पाटील

■ मुंबई

अत्यंत कुशाग्र बुद्धिमत्ता असलेल्या आणि गणितात हुशार म्हणून ओळखण्यात येणाऱ्या रेखाताई रघुनाथराव थोरात यांचे वयाच्या ७८ व्या वर्षी वार्धक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात रश्मी जोशी, राजीव थोरात, राजेश्री निगुडकर हे कन्या आणि सुपूत्र, जावई, नातवंडे असा परिवार आहे. रेखाताई आणि त्यांचे पती हे बोरीवली पूर्व येथील कुसुमभारती सहकारी गृहनिर्माण संस्था येथे अनेक वर्षांपासून वास्तव्यास होते. रघुनाथराव हे आपल्या उमेदीच्या काळात इंडियन एक्सप्रेस मध्ये ही कार्यरत होते. या सहकारी गृहनिर्माण संस्थेत त्यांनी अध्यक्षपद ही भूषविले होते. काही वर्षांपूर्वी रघुनाथराव यांचे देहावसान झाल्यानंतर रेखाताई या कुसुमभारती मध्ये रहात होत्या.

सुमारे २८ वर्षे पोस्ट अँड टेलीग्राफ विभागात त्यांनी नोकरी केली. त्या पोस्ट आणि टेलीग्राफ या विभागातील पहिल्या आणि मोजक्या प्रशिक्षित महिला म्हणून टेलीग्राम (तार) या कामासाठी ओळखल्या जात होत्या. या विभागात सर्वोत्कृष्ट काम केल्यामुळे त्यांचा अतिशय सन्मान करण्यात येत होता. त्यांनी आपल्या गुणवत्तेच्या जोरावर आपले कर्तव्य पार पाडले. त्यांनी बढतीसाठी इन्कार केला आणि स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली. तळोजा पनवेल येथे काही काळ वास्तव्य केल्यानंतर त्यांनी तेथेच अखेरचा श्वास घेतला. परंतु त्यांची बोरीवलीच्या कुसुमभारतीमध्ये आपल्या आयुष्याचा अखेरचा क्षण व्यतीत करण्याची इच्छा होती, म्हणून त्यांना बोरीवलीच्या घरी आणण्यात आले. तेथे सर्वांनी अंत्यदर्शन घेतले आणि दौलतनगर स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. रेखाताई थोरात यांच्या निधनाने एक अत्यंत कुशाग्र बुद्धीच्या, सुस्वभावी व्यक्तिमत्वाला गमावले असल्याची भावना सर्वांनी व्यक्त केली.

केंद्र शासनाच्या कांदा निर्यात बंदीमुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होईल -पणन मंत्री बाळासाहेब पाटील

■ मुंबई

केंद्र शासनाने कांदा निर्यात बंदीचा निर्णय घेतल्याने कांद्याच्या दरात घसरण सुरू झाली असून कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे असे पणन मंत्री बाळासाहेब पाटील यांनी सांगितले.

पाटील म्हणाले, देशातील एकूण कांदा उत्पादनाचा विचार केला तर महाराष्ट्रात ७५ टक्के कांद्याचे उत्पादन घेतले जाते. निर्याती मध्ये सुद्धा जवळपास ८० टक्के कांदा हा राज्यातील शेतकरी बांधवांचा असतो त्यामुळे या शेतकरी बांधवांचे मोठे नुकसान होईल.

शरद पवार यांनी सुद्धा काल केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्री पियुष गोयल यांची भेट घेऊन कांदा निर्यातबंदी संदर्भात चर्चा केली.तसेच राज्यात विविध ठिकाणी आंदोलन सुरू झाली आहेत, लिलाव थांबले आहेत या सर्व बाबींचा विचार करून केंद्र शासनाने कांदा निर्यात बंदीच्या निर्णयाचा फेरविचार करावा असेही पाटील यांनी सांगितले.

मा.मुख्यमंत्री मंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री बाळासाहेब पाटील, कृषी मंत्री दादाजी भिसे यांच्याशी चर्चा करून केंद्र शासनाला कांदा निर्यात बंदी उठवावी अशी विनंती करण्यात येईल असेही पाटील यांनी सांगितले.

सिडकोच्या सहव्यवस्थापकीय संचालकपदी एस. एस. पाटील व कैलास शिंदे

मुख्य दक्षता अधिकारी पदी एस. एच. महावरकर

■ नवी मुंबई

भारतीय प्रशासकीय सेवेतील एस. एस. पाटील व कैलास शिंदे यांनी सिडकोच्या सहव्यवस्थापकीय संचालक पदाचा कार्यभार स्वीकारला आहे. तर एस. एच. महावरकर यांनी सिडकोच्या मुख्य दक्षता अधिकारी पदाचा कार्यभार स्वीकारला आहे.

एस.एस. पाटील सन २०११ च्या तुकडीतील व कैलास शिंदे सन २०१३च्या तुकडीतील भारतीय प्रशासकीय सेवा (आयएएस) अधिकारी आहेत तर एस. एच. महावरकर हे सन २००५च्या तुकडीतील महाराष्ट्र कॅडरचे भारतीय पोलीस सेवा (आयपीएस) अधिकारी आहेत.

सिडको महामंडळात सहव्यवस्थापकीय संचालक पदाचा कार्यभार स्वीकारण्यापूर्वी एस. एस. पाटील जिल्हा परिषद, अहमदनगर येथे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत होते तर कैलास शिंदे पालघर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत होते. एस.एच. महावरकर सिडकोतील मुख्य दक्षता अधिकारी पदाचा कार्यभार स्वीकारण्यापूर्वी नागपूर पोलिस आयुक्तालयामध्ये अपर पोलीस आयुक्त म्हणून कार्यरत होते.

एसपीव्ही ग्लोबल ट्रेडिंग लिमिटेड

(पूर्वी टॅरिफ सिने अँड फायनांस लिमिटेड म्हणून ज्ञात)
सीआयएनः एल२७१००एमएच१९८५पीएलसी०३५२६८
''२८/३०, अनंत वाडी, बिनानी भवन, तळ मजला, भुलेश्वर, मुंबई ४००००२.
ई-मेलः spvglobaltrading@gmail.com, संकेतस्थळः www.spvglobal.in"

जून ३०, २०२० रोजी संपलेल्या त्रैमासिकासाठी अलेखापरीक्षित वित्तिय निष्कर्षाचा आराखडा

(रु. लाखांमध्ये)

अनु. क्र.	तपशिल	एकमेव			एकत्रिकृत		
		संपलेले त्रैमासिक	गत वर्षामधील संपलेले सुसंगत ३ महिने संपलेले त्रैमासिक	संपलेले गत वर्ष	संपलेले त्रैमासिक	गत वर्षामधील संपलेले सुसंगत ३ महिने संपलेले त्रैमासिक	संपलेले गत वर्ष
		३०-जून-२०	३०-जून- १९	३१-मार्च-२०	३०-जून-२०	३०-जून- १९	३०-जून-२०
१	कार्यामधून एकूण उत्पन्न (निव्वळ)	०.५९	०.०२	३,००९.१२	६,३७९.१५	१०,८७५.४७	४५,८५६.७६
२	सामान्य कार्यामधून कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) (कर, अपवादात्मक आणि/ किंवा अतिविशिष्ट बाबींपूर्व)	(२.२०)	(५.२३)	३६.३६	(४०८.३१)	२८३.४५	१,२२५.६०
३	कर पूर्व कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) (अपवादात्मक आणि/ किंवा अतिविशिष्ट बाबींपश्चात)	(२.२०)	(५.२३)	३६.३६	(४०८.३१)	१५,९७५.७६	१६,५९१.४८
४	कर पश्चात कालावधीसाठी निव्वळ नफा (तोटा) (अपवादात्मक आणि/ किंवा अतिविशिष्ट बाबींपश्चात)	(२.२९)	(५.२२)	३६.४७	(४२८.६३)	१२,८५३.२२	१४,००२.८६
५	कालावधी/ वर्षासाठी एकूण सर्वकष उत्पन्न (कालावधीसाठी एकत्रित नफा/ (तोटा) (कर पश्चात)	(२.१२)	(५.२७)	३६.३८	(४२६.४६)	१२,८५३.१७	१३,९८५.९७
६	सम भाग भांडवल (रु. १०/- प्रती भाग दर्शनी मूल्य)	२४.५०	२४.५०	२४.५०	२४.५०	२४.५०	२४.५०
७	राखीव (पुनर्मुल्यांकित राखीव वगळता) गत वर्षाच्या लेखापरीक्षित ताळेबंदामध्ये दाखविल्यानुसार	-	-	११२.३१	-		११,७८६.२९
८	प्रती समभाग उत्पन्न (अतिविशिष्ट बाबीपूर्व) (रु. १०/- प्रत्येकी) (वार्षिकीकरण नाही)						
	(ए) मूळ	(०.९३)	२.१३)	१४.८९	(१७४.९५)	(२६८.११)	२०१.१३
	(बी) सौम्यिकृत	(०.९३)	२.१३)	१४.८९	(१७४.९५)	(२६८.११)	२०१.१३
९	प्रती समभाग उत्पन्न (अतिविशिष्ट बाबीपूर्व) (रु. १०/- प्रत्येकी) (वार्षिकीकरण नाही)						
	(ए) मूळ	(०.९३)	२.१३)	१४.८९	(१७४.९५)	५,२४६.२१	५,७१५.४५
	(बी) सौम्यिकृत	(०.९३)	२.१३)	१४.८९	(१७४.९५)	५,२४६.२१	५,७१५.४५

टिपाः
१. उपरोक्त निष्कर्ष हे सेबी (लिस्टिंग अँड ऑब्लिगेशन डिसक्लोझर रिक्वायरमेंटस), नियमावली, २०१५ च्या नियम ३३ च्या मान्यतेच्या अनुसार प्रसिद्ध करण्यात आले आहे आणि लेखा परीक्षण समितीद्वारे समीक्षण करण्यात आले आहे आणि संचालक मंडळाद्वारे १५ सप्टेंबर २०२० रोजी झालेल्या त्यांच्या सभेमध्ये संमत करण्यात आले आहेत आणि सुंवैधानिक समीक्षकांच्याद्वारे मर्यादित समीक्षणावर आधारित आहे. ३१ मार्च २०२० रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि वर्षासाठीचा वित्तिय निष्कर्षाचा आराखडा www.bse.india.com आणि www.spvglobal.in वर उपलब्ध आहे.
२. वित्तिय निष्कर्ष कंपनी कायद्याच्या अनुसार इंडियन अकाऊंटिंग स्टँडर्ड (इंड एएस) च्या अनुसार (इंडियन अकाऊंटिंग स्टँडर्ड), नियमावली, २०१५ (वेळोवेळी फेरफार करण्यात आलेले) आणि कंपनी कायदा २०१३ च्या कलम १३३ च्या अंतर्गत अधिसूचित करण्यात आल्या नुसार तयार करण्यात आले आहेत.
३. डब्ल्यूएचओ द्वारे ११ मार्च, २०२० रोजी कोविड १९ ही जागतिक महामारी जाहीर करण्यात आली आणि भारत सरकारने २४ मार्च २०२० टाळेबंदी जाहीर केली. आम्हाला असे वाटत आहे की सध्याच्या महामारीचे परिणाम प्रक्रियेवर परिणाम करणारी असून भारताच्या आर्थिक गुंतवणुकीवर त्याचा परिणाम होणार आहे. महामारीमुळे उद्भवणाऱ्या आगामी परिस्थितीवर सर्व साहित्यावर नियंत्रण ठेवण्याचा कंपनी प्रयत्न करा आहे.
४. गत कालावधीमधील आकडे चालू कालावधीमधील आकड्यामध्ये मेळ घालण्यासाठी पुनर्गठीत, आवश्यकतेच्या अनुसार करण्यात आले आहे.

संचालक मंडळासाठी आणि त्यांच्या वतीने
एसपीव्ही ग्लोबल ट्रेडिंग लिमिटेड
सही/-
(बाळकृष्ण बिनानी)
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएनः ००१७५०८०

ठिकाणः मुंबई
दिनांकः १५ सप्टेंबर २०२०